**चिचडोह बॅरेज प्रकल्प ता. चामोर्शी, जि. गडचिरोली योजनेस व्दितीय सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करणेबाबत.**

## विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर

**महामंडळ निर्णय क्रमांक: 130 /विपाविम/कातां ६(२)/(धा.क्र. चिचडोह बॅरेज प्रकल्प / व्दितीय सुप्रमा/ २०२३, दिनांक. 24/07/2023**

**संदर्भ** :-
1. महामंडळाचे निर्णय क्र. २०५/विपाविम/कांता-६(२)/ चिचडोह बॅरेज सुप्रमा/ (३१४/२०१५)/ २०१६ दि. २६.०७.२०१६
2. शासन निर्णय क्र. संकीर्ण २०१५/(३५/२०१५)/जसं(आ), दि. ०९.०९.२०१५.
3. राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती, नासिक यांचे पत्र. क्र. रातांसस(१)/कक्ष -२/(मु )/धा. क्र. ६७/२०२२)/१८२/२०२२ दि.२४/०२/२०२३
4. अतिरीक्त मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, यांचे अध्यक्षतेखाली दि.०२/०६/२०२३ रोजी झालेल्या सचिव स्तरावरील उपसमितीच्या बैठकीचे इतिवृत्त क्र. बैठक-२०२३/(३७/२०२३)/लपा, दि. १३/०६/२०२३.
5. विपाविम नियामक मंडळाचे दि. १९/०६/२०२३ चे ८३ व्या बैठकीतील ठराव क्र. ८३/४४

**प्रस्तावना** :

चिचडोह बॅरेज प्रकल्प, हा या महामंडळांतर्गत गोदावरी खो-यातील वैनगंगा उपखो-यात आदिवासी व नक्षलग्रस्त गडचिरोली जिल्ह्यातील चामोर्शी तालुक्यातील वैनगंगा नदीवर चामोर्शी तालुका जवळ बांधण्यात येत आहे. सदर योजनेमुळे गडचिरोली जिल्ह्यातील ४३ गावांना व चंद्रपूर जिल्हातील २८ गावांना अश्या एकुण ७१ गावातील ११५१० हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा लाभ मिळणार आहे.

चिचडोह बॅरेज प्रकल्पास महामंडळ निर्णय क्र. २०५विपाविम/कांता-६(२)/ चिचडोह बॅरेज सुप्रमा/(३१४/२०१५)/२०१६ दि. २६.०७.२०१६ नुसार सन २०१३-१४ च्या दरसुचीवर आधारित रु. ५९७.४४ कोटी (रू. पाचशे सत्त्यान्व कोटी चवरेचाळीस लक्ष फक्त ) इतक्या रकमेस नव्याने प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे.

बांधकामाचे दरम्यान योजनेच्या खर्चात भुसंपादन खर्चातील वाढ, इतर कारणे व अनुषंगीक खर्च इत्यादी कारणामुळे वाढ झाली असून योजनेची अद्यावत किंमत मुळप्रशासकीय मान्यता किंमतीच्या दहा टक्क्याहून अधिक वाढत असल्यामुळे व्दितीय सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करणे आवश्यक झाले आहे.

चिचडोह बॅरेज प्रकल्प व्दितीय सुप्रमा बाबतचा छाननी अहवाल राज्यस्तरीय तांत्रीक सल्लागार समिती (१), नाशिक, यांचे दि. २८/१२/२०२२ रोजीच्या १८२ व्या बैठकीत अंतिम करण्यात आला असून पुढील कार्यवाहीस्तव संदर्भिय पत्र क्र. ३ नुसार प्राप्त झालेला आहे.

चिचडोह बॅरेज प्रकल्पच्या व्दितीय सुप्रमा प्रस्तावावर अतिरीक्त मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, यांचे अध्यक्षतेखाली दि.०२/०६/२०२३ रोजी झालेल्या मा. सचिव स्तरावरील उपसमितीचे बैठकीत (संदर्भ-४) चर्चा होवून राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समितीच्या तपासणी अहवालातील मुद्दा क्र. २६ व २७ ची पुर्तता करण्याच्या तसेच प्रकल्पाची सर्व कामे जुन २०२४ पर्यंत पुर्ण करणेच्या अटीच्या अधीन राहून प्रस्ताव नियामक मंडळासमोर पुढील निर्णयार्थ सादर करण्यास सहमती दर्शविण्यात आली आहे.

संदर्भ क्र. २ च्या शासन निर्णयानुसार विदर्भातील प्रकल्पांना सु.प्र.मा. देण्याचे अधिकार महामंडळास प्रदान करण्यात आलेले आहेत.

दि. १९/०६/२०२३ रोजी झालेल्या नियामक मंडळाचे ८३ व्या बैठकीतील ठराव क्र. ८३/४४ नुसार चिचडोह बॅरेज प्रकल्पच्या रू. ६९७.८ कोटी अंदाजित किंमतीच्या व्दितीय सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रस्तावास राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समितीच्या तपासणी अहवालातील मुद्दा क्र. २७ ची पुर्तता करण्याच्या अटीच्या अधीन राहून व सचिव स्तरीय उपसमितीची सुप्रमास मंजुरीची शिफारस लक्षात घेता मान्यता दिली असून या बाबतचे आदेश कार्यकारी संचालक यांनी निर्गमित करण्याकरिता नियामक मंडळाने सर्वानुमते मान्यता प्रदान केलेली आहे.

सदर प्रकल्पाच्या प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता किंमत रू. ५९७.४४ कोटी च्या तुलनेत व्दितीय सुधारित प्रकल्प अहवालाची किंमत रू. १००.६७ कोटी ने जास्त आहे. किंमत वाढीची प्रमुख कारणे पुढीलप्रमाणे आहेतः-

| अ. क्र. | बाब | वाढ (रू कोटी) | मंजूर प्रथम सुप्रमा किंमतीच्या तुलनेत वाढीची टक्केवारी | एकूण वाढीच्या तुलनेत वाढीची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | दरसुचीतील बदलामुळे वाढ | ००.०० | ० | ० |
| २ | जादा दराच्या निविदा स्विकृतीमुळे वाढ | ००.०० | ० | ० |
| ३ | भूसंपादनाच्या किंमतीतील वाढ | ८२.२५ | २९.०९ | ८१.७० |
| ४ | संकल्पचित्रातील बदलामुळे झालेली वाढ | ००.०० | ० | ००.०० |
| ५ | इतर कारणांमुळे झालेली वाढ | १३.९७ | ४.९४ | १३.८७ |
| ६ | अनुषंगीक खर्च वाढ | ४.४४ | १.५७ | ४.४२ |
| | **एकूण** | **१००.६७** | **३५.६** | **१००.००** |

**विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाचा निर्णय** :

विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ आता या निर्णयान्वये गडचिरोली जिल्ह्यातील चिचडोह बॅरेज प्रकल्प, ता. चामोर्शी, जि. गडचिरोली या योजनेच्या रू. ६९७.८ कोटी (रू.सहाशे सत्त्यान्नव कोटी अंशी लक्ष फक्त) किंमतीस व्दितीय सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे. त्यापैकी रू. ६५५.३३ कोटी कामाप्रित्यर्थ व रू.४२.४७ कोटी अनुषंगीक खर्च आहे. अंदाजपत्रकात उर्वरीत कामांसाठी जलसंपदा विभागाची व सार्वजनिक बांधकाम विभागाची सन २०२२-२३ च्या दरसूचीप्रमाणे दर वापरण्यात आले आहेत.

प्रकल्पाच्या उपशिर्षवार किंमतीचा गोषवारा सोबतच्या परिशिष्टामध्ये संलग्नित आहे.

१. ठळक बाबी –

| | |
|---|---|
| अ) योजनेचे सिंचन क्षेत्र | ११५१० हेक्टर |
| ब) योजनेमुळे एकुण होणारा पाणीसाठा | ६२.०१७ द.ल.घ.मी. |
| क) पाण्याची साठयाची प्रती स.घ.मी. किंमत | रू.१.१२ लक्ष /- (मापदंड रु.१.२२ लक्ष पेक्षा कमी) |
| ड) योजनेचे लाभव्यय गुणोत्तर | १.६७ (मापदंड १.५० पेक्षा जास्त) |
| इ) आर्थिक परतावा दर | १८.१०(मापदंड १२ पेक्षा जास्त) |

२. या योजनेच्या कामावरील खर्च मागणी क्र.आय -५, मुख्य लेखाशिर्ष "४७०१", मध्यम पाटबंधारे यावरील भांडवली खर्च पंचवार्षिक योजनेअंतर्गत योजना, (१९०) सार्वजनिक क्षेत्रातील व इतर उपक्रमातील गुंतवणुका (शासन अंशदान), (मध्यम प्रकल्प), विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ भाग भांडवली अंशदान (४७०१ H-६६५) या लेखाशीर्षाखाली खर्ची घालावा व विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाकडील मंजुर अनुदानातून भागविण्यात यावा.

३. या योजनेस प्रदान केलेली व्दितीय सुधारित प्रशासकीय मान्यता (१२ /२०२३) या अनुक्रमांकावर नोंदविण्यात आली आहे.

४. सदर व्दितीय सुधारित प्रशासकीय मान्यता खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

४.१) सदर सुधारीत प्रशासकीय मान्यता म्हणजे प्रकल्प कार्यान्वयीन करण्याच्या विविध टप्प्यावर झालेल्या अनियमिततेस मान्यता गृहीत धरता येणार नाही.

४.२) सुधारीत प्रशासकीय मान्यता म्हणजे अहवालातील तांत्रिक बाबी अथवा निविदा विषयक क्षेत्रिय स्तरावरील निर्णयास किंवा झालेल्या क्षेत्रिय अनियमीततेस मान्यता गृहीत धरली जाणार नाही.

४.३) व्दितीय सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्याच्या निर्णयामुळे या प्रकल्पाबाबत सुरु असलेल्या अथवा भविष्यात उद्भवणाऱ्या विभागीय चौकशीच्या कार्यवाहीस कोणतीही बाधा पोहचणार नाही, ती कार्यवाही तशीच चालु ठेवावी.

४.४) आर्थिक दायित्व निर्माण होईल अशा नवीन घटकांचा शासन मान्यतेशिवाय समावेश करण्यात येऊ नये.